# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक १७/०७/२०२४

➢ दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव | आरोपीचे नाव व | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे गाडगेनगर अप क्र. ६१७/२०२४ कलम ११८(१), ३५२,३५१ (१)(२)बी एन एस | केवल कॉलनी अमरावी | गु.घ.ता.वेळ दि.०२/०७/ २०२४ चे सायंकाळी चे दरम्याण माहीती गु.दा.ता.वेळ दि.१६/०७/ २०२४ चे १६.५३ वा. | अंकुश राजु आठवले वय २५ वर्ष रा.पाण्याच्या टाकी जवळ गाडगेगर अमरावती | गजानन सावरकर रा.टाकरेखेडा शंभु परतवाडा रोड अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, आरोपी हे अर्जदार यांचे वडीला कडे कामावर होते .नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी गैरअर्जदार हे कामावर उशिरा आले व अर्जदार याचे वडीलांनी म्हटले की तुला लवकर सुट्टी देवु शकत नाही .म्हणुन आरोपी यांनी सायंकाळी ५.३० वा.चे दरम्याण अर्जदार यांचे वडीलान सोबत पैशाचे कारणा वरुन वाद घातला व अर्जदार यांचे वडीलांचे डोक्यावर लोखंडी हातोडा डोक्यावर मारला व धमकी दिली की मी बायाणा आणुन तुला मारेल अशी धमकी दिली .आरोपी यानी या आगोदर सुध्दा अर्जदार यांचे वडीलाना मारण्याची धमकी दिली होती व तो अर्जदार यांचे वडीलान सोबत नेहमी वाद करीत होता व अर्जदार यांचे वडीलाना मार लागले नंतर अर्जदार हे अर्जदार यांचे वडीलाना इर्विन दावाखाना येथे घेवुन गेले होते.त्यांचा तेथे इलाज केला इर्विन दावाखाना येथिल डॉ.साहेबांनी त्यांना सुपर स्पेशालीटी दवाखाना येथे घेवुन जाण्यास सांगितले व अर्जदार हे त्याचे वडीलांना पर स्पेशालीटी दवाखाना येथे घेवुन गेले व तेथे वडीलांचे ऑपरेशन झाले नंतर अर्जदार हे वडीलांना घरी घेवुन आले होते.तेव्हा पुन्हा आरोपी ने अर्जदार यांचे वडीलाना फोन वर मारण्याची धमकी दिली म्हणुन पुन्हा अर्जदार यांचे वडीलाना तब्येत खराब झाली म्हणुन त्याचा इलाज चालु आहे अर्जदार यांचे वडीलाना डोक्यावर मार लागला असुन ते सुपर स्पेशालीटी दावाखाना येथे आयसी सीयु मध्ये ऑक्सीजन वर आहे.म्हणु न आरोपी विरुध्द अर्जदार हे तक्रार देत आहे. त्याचे वर कार्यवाही व्हावी अशा फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन आरोपी यांचे वर कलम ११८(१),३५२,३५१(१)(२)बी एन एस चा गुन्ह ा नोंद करण्यात आला आहे . .अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ स्त्रि अत्यांचार :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता (गुन्हेगारी पुर्व ईतिहास) | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे गाडगेनगर अमरावती शहर अप क्र. ६१८/२०२४ कलम ४९८(अ), ३२३,५०४,५०६,३४ भादवी | कापसी ता.जि. अकोला | गु.घ.ता.वेळ दि.११/०२/२०२१ ते दि.१९/०३/२०२४ चे रात्री ०८.००वा माहीती गु.दा.ता.वेळ दि.१६.०७.२०२४ चे १७.२१ वा. | एक महिला | फिर्यादी महिलेचे नातेवाईक सर्व रा. कापसी ता.जि.अकोला | हकीकतअशा प्रकारे आहे की, यातिल फिर्यादी यांचे लग्न आरोपी क्र.१ यांचे सोबत रिती रिवाजा प्रमाणे झाले असुन फिर्यादी हे सासरी गेली असता आरोपी क्र.१ हे यांना दारुचे व्यसन असुन ते कुठलेही कामधंदा करीत नव्हते काही दिवस आरोपी क्र.१ हे काही दिवस चागले राहीले व फिर्यादीने आरोपीला सुधारण्याचा प्रयत्न केला असता आरोपी क्र.२,३,४,५यांनी फिर्यादीयास तु कामाला जावुन पैसे आण असे म्हणुन त्रास देत होते व घरातील कामा बद्दल वाद करत होते आरोपी क्र.१ यांनी फिर्यादी हे सासरी असतांना दारु पिण्याकरीता पैसे मागत होते तेव्हा पैसे नाही दिले का कारणा वरुनआरोपी क्र.२,३,४यानी फिर्यादीस शिविगाळ केली व आरोपी क्र.१ हे तुझ्या जवळ येणार नाही तु दुसरी कडे जा असे म्हणुन आरोपी क्र.२,३,४ यानी थापडाबुक्यानी मारहाण केली तु कामाला जा व पैसे कमावुन घरात आण व सोबत मुलीला सुध्दा घेवुन जात जा अशी धमकी दिली. .अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | राजापेठ अप.क्र. ४२१/२४ कलम ३०३(२) बि.एन.एस | व्ही.आय कंपनीच्या सव्हीस सेंटर गुलशन प्लाझा शॉप नं. ३/४ बडनेरा रोड अमरावती | दि.१३/०७/२०२४ चे २०/०० वा. ते दि.१५/०७/२०२४ चे ०९/३० वा. दरम्यान<br><br>दि.१६/०७/२०२४ चे १८/१० वा. | सुकांत सुरेशचंद्र अग्रवाल वय ४४ वर्षे धंदा खाजगी नोकरी रा. रोकडीया नगर ता. शेगाव बुलढाणा ह.मु. भुतळा केशवबाग सोसायटी जैन मंदीर जवळ बडनेरा रोड अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील घटना ता. वेळी व ठिकाणी फि. यांनी व्ही. आय. कंपनीच्या सव्हीस सेंटर ऑफिस बंद करुन घरी गेले असता दि.१५/०७/२०२४ रोजी ऑफीस बॉय सचिन नागोसे यांनी ऑफिस उघडले असता ए.सी. ऑन करुन पाहीले तेर ए.सी. ऑन झाला नाही. वरुन त्याने बाहेर जावुन पाहीले असता ए.सी. चा आऊट डोअर युनिट चेक केले दिसुन आले नाही. त्याबाबत परीसरात शोध घेतला असता मिळुन आले नाही. नमुद घटना ता. वेळे दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने सर्व्हीस सेंटर मधिल ए.सी. चा आऊट डोअर युनिट क्रिम रंगाचा चोरुन नेला अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | पिडीताचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | बडनेरा अप.नं. ४४१/२४ कलम १२५(अ), १२५(ब), २८१ भा. न्या. सं. | जायका मोटर्स शोरूम समोर, बडनेरा रोड. | घटना ता. वेळ दि. ०८.०७.२४ चे १२.३० वा. माहीती वेळ - दि. १६.०७.२४ चे १८.०० वा. दाखल वेळ - दि. १६.०७.२४ चे १९.५४ वा. | सतिश नागोरावजी श्रीवास, वय ३९ वर्षे, रा. कडवी बाजार, मसानगंज, अमरावती. | अज्ञात सिटी बस चालक. | सतिश नागोरावजी श्रीवास, वय ३९ वर्षे, रा. कडवी बाजार, मसानगंज, अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी त्यांची दुचाकी एक्टीवा गाडी क्र. MH-२७-DR-५४४० ने रस्त्याने जात असतांना रस्त्याचे काम सुरू असल्याने दोन्ही बाजुने वाहतुक सुरू असतांना यातील आरोपी सिटी बस चालकाने त्याच्या ताब्यातील वस निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या वाहनाला समोरून धडक दिली. त्यामुळे फिर्यादी हे जखमी झाले व इर्विन दवाखाना, अमरावती येथे उपचार केले. अशा फिर्यादीच्या बयाणावरून सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | नादगापेठ अप क्र. २३३/२०२४ कलम २८१,१२५(A),१२५(B) भा.न्या.सं. | मेजवानी हॉटेल नॅशनल हायवे जवळ नांदगावपेठ | दि.०६/०७/२०२४ चे ०७.०० वा.<br><br>दाखल ता.वेळ दि.१६/०७/२०२४चे १८.१५ वा. | राजेश कैलासराव वानखडे वय ३८ वर्ष धंदा- मजुरी रा.बोरगाव धर्माळे ता.जि.अमरावती | MH२७DD६१३० चे चालक राजकिरण गणेश इंगळे वय २६ वर्षे रा.इंदला पो.स्टे.फ्रेजर पुरा | -- | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फि चे वडिल नामे कैलास पांडुरंगजी वानखडे वय ६० वर्षे हे दि ०६/०७/२०२४ रोजी संध्याकाळी ०७/०० वा दरम्यान त्यांची अँक्टीव्हा गाडी क्र MH२७DP६८८४ ही पंचर असल्याने सदर गाडी मेजवाणी हॉटेल जवळ ठेवुन गाडी मध्ये पेर्टोल कमी असल्याने रोड क्रास करुन पेर्टोलपंपावर गेले व परत रस्ता क्रास करुन येत असता नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील नांदगावपेठ ते अमरावती कडे जाणाऱ्या नमुद आरोपीचे वाहन चालकाने फि चे वडिलास धडक दिल्ने फि चे वडिल रोडवर काली पडल्याने त्याच्या डाव्या पायाल मार लागला येथील लोकांनी आय.आर.बी.च्या अँम्बुलंन्स चे पंजाबराव देशमुख हॉस्पीटल अमरावती येथे भर्ती केले अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ विश्वासघात / फसवणुक :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो.स्टे. सायबर अमरावती अप.ा. ३९/२०२४ कलम ४१९,४२०, भा.द.वि. सहकमल ६६(C), ६६(D), माहिती तंत्रज्ञान कायदा | सिंधी कॅम्प नवी वस्ती, बडनेरा, अमरावती | २६.०३.२०२४ चे १२.२४ वा पासुन १५.०५.२०२४ चे ०८.०० पावेतो दाखल ता. वेळ १६.०७.२०२४ चे १०.१० वा | रवी जयरामदास दुल्हानी वय ४० वर्ष व्यवसाय- व्यापार रा. सिंधी कॅम्प नवी वस्ती, बडनेरा, अमरावती | Whatsapp group - (A२) AQR WEALTH TRAINING CAMP व ०६ वेगवेगळे बँक अकाउंट धारक | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांना दिनांक २६.०३.२०२४ ते १५.०५.२०२४ दरम्यान यातील नमुद आरोपींतांनी शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक करुन भरपूर नफा देण्याचे आमिष दाखवुन वेगवेगळी कारणे सांगुन फिर्यादीची एकुण ६४७०००/- रु. ची आर्थीक फसवणुक केली आहे . अशा फि च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०२ | पो.स्टे गाडगेनगर अमरावती शहर अप क्र. ६१६/२०२४ कलम ६६(ड) माहीती तत्रज्ञान अधिनियम | गुरुदेव कॉलनी व्हिएमव्ही परिसर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.२६/०६/२०२४ पुर्वी माहीती गु.दा.ता.वेळ दि.१६/०७/२०२४ चे १६.१९ वा. | मिथिलेश राजीव बजाज वय२६वर्ष रा.गुरुदेव कॉलनी व्हिएमव्ही परिसर अमरावती | ९२१०२००३५९०८५५५ एमईईआरयुटी जी वाय एम इक्युमेन्टट कंपनी | हकीकत अशा प्रकारे आहे की, अर्जदार यांचा व्यायाम शाळाचा व्यवसाय असुन अर्जदार याना ऑन लाईन वेबसाईटवर व्यायाम शाळेची काही ६ उपकरणे कि.२,५०,०००/- रु.ची ९२१०२००३५९०८५५५ एमईईआरयुटी जी वाय एम इक्युमेन्टट कंपनी या खातेधारकांनी सागितली व पैसे जमा करण्याबाबत सांगितले .तसेच मी नमुद दि.२६/०६/२०२४ रोजी स्टटे बँक ऑफ इंडिया ब्रँच नवसारी येथुन खात्यातुन मी आरटी जी एस स्वरुपात पाठविले सदर चे आर टी जी एस युटी आर नं.एस बी आय एन १२४१७२१८४८३६ द्वारे १,५०,०००/- रु.असे पाठविले सदर रक्कम मी जमा केली असता माझी ऑडर दि.२६/०४/२०२४ रोजी आली परंतु सदरची ऑडर ही छोट्या बॉक्स मध्ये असल्या कारणाने मी त्याला संपर्क केला असता त्यानी मला असे कडविले की चुकीचे ऑडर तुम्हाला डिलीव्हर आले काही दिवसात तुम्हाला सर्व ऑर्डर डिलिव्हर होणार परंतु तसे झाले नाही व त्या वारंवार मला संदेश पाठवुन सुध्दा त्याचा संपर्क होत नव्हता व सदरहुन कंपनिचे सर्व नंबर बंद येत असल्या कारणाने मला कडले की माझी फसवणुक झाली आहे.तसेच अर्जातुन आपनास न्रम विनंती आहे .सदरचा प्रकरणाचा मला न्याय मिळुन द्यावा ही विनंती .अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➤ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | **फ्रेजरपुरा अमरावती.** | अप क्र ६२९/२०२४ कलम ६५ [फ] महा. दा. का. | गवळीपुरा सरदार चौक फ्रेजुरपुरा अमरावती | दि. १६/०७/२०२४ चे २०.०० वा | दि. १६/०७/२०२४ चे ००.५०वा | पोहेकॉ जावेद अहमद अब्दुल समद ब नं १०२२ गुन्हेशाखा अमरावती शहर | हुसेन गंगा बेनिवाले वय ५५ वर्ष रा. सरदार चौक गवळीपुरा फ्रेजरपुरा अमरावती | पोहेकॉ जावेद अहमद अब्दुल समद ब नं १०२२ गुन्हे शाखा अमरावती शहर | हकिकत अशा प्रकारे आहे कि गुप्त बातमीवरून खात्रीलायक माहीती प्राप्तवरून नमुद घ ता वेळ व ठिकाणी पोस्टे व पंचाच्या मदतीने आरोपीवर प्रोव्ही रेड करून आरोपीच्या ताब्यातुन १० लिटर गावठी हात भट्टीची दारू कि. अं ३०००/रू ची प्रोव्ही माल जप्त करण्यात आलाण टशा फिर्यादी च्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |
| ०२ | पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | अप क्र ६३३/२०२४ कलम ६५ [अ] (ई) महा. दा. का. | **अमर कॉलनी, चौक सार्वजनिक रोडवर, अमरावती** | दि. १६/०७/२०२४ चे २०.४० वा | दि. १६/०७/२०२४ चे २०.०७ वा | पोहेकॉ **सुंदरकर** ब नं १०५६ गुन्हे शाखा अम. शहर | **गौतम विनोद हिरे वय २९ वर्ष रा. बेनोडा अमरावती** | **पोउपनि. देवकते पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती सहर** | **हकिकत अशा प्रकारे आहे कि गुप्त बातमदाराकडुन माहीती मिळाली की एक इसम हा गाडी वर आवैधरित्या दारुचा माल घेवुन जात आहे अश्या माहीती वरुन नमुद आरोपीवर प्रोव्ही रेड करुन त्यास ताब्यात घेतले असता त्याच्या ताब्यातुन एकुण ५०० नग देशी दारु बॉबी संत्रा म्व टॅंगो पंच च्या ९० एम एल च्या पावटया कि.अ.१७५००/- रुपयाचा माल व होन्डा मॅस्ट्रो कंपणीची सिल्व्हर रंगाची मोपेड वाहन क्र. MH-२७ BN-६३२४ क्रमांकाची कि.अ.६००००/- रुपयाची असा एकुण ७७५००/- रुपायाच माल मिळुन आला अश्या फिच्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |
| ०३ | **नादगापेठ** | **अप क्र. २३४/२०२४ कलम ६५(ई) म.दा.का.** | **टाउनशिप कठोरा बु** | **दि १६/०७/२०२४ चे ११/०० वा** | **दि १६/०७/२०२४ चे १९/२२ वा** | **सरतर्फे पोउपनी सुनील खंडारे पोस्टे नांदगावपेठ मो** | **अभिषेक भगवानसिंह ठाकुर वय ३३ वर्षे रा.गजानन टाउनशिप कठोरा बु** | **--** | **थोडक्यात हकीगत अशा प्रकारे आहे की फि यांची पोस्टे ला दि १५/०७/२०२४ चे २१/०० वा ते दि १६/०७/२०२४ चे ०९/०० वा पावेतो नाईट डिओ ड्युटी असता मिळालेल्या गृप्त माहीती वरुन असता सदर आरोपी हा त्यांची अँक्टीव्हा बाईक क्र MH२७CE३९३३ ने अमरावती कडुन येत पंचा समक्ष सदर बाईक चे सिट डिक्की मध्ये एका नायलॉंन तेली मध्ये ४० नग मिली देशी दारु बॉबी संत्रा पावट्या किमत अंदाजे २००० रुपये व अँक्टीवा गाडी क्र MH२७CE३९३३ कि.अं.३५००० रुपये असा एकुण ३७००० रु माल पंचा समक्ष जप्त करण्यात आला अशा फि च्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल** |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | राजापेठ | अप.क्र.४२२/२४ कलम ६५(अ)(ई) म.दा.कायदा | यशोनंद पाळणाघर समोरील बेलपुरा रोड अमरावती | दि.१६/०७/२०२४ चे १६/४० वा. ते १७/३० वा. दरम्यान | दि.१६/०४/२०२४ चे १९/१५ वा. | सरतर्फे पो.हे.का. दिपक महादेव सुंदरकर ब.नं. १४५६ गुन्हे शाखा अमरावती शहर | यश शशिकांत काटे वय २२ वर्षे चिचफैल अमरावती | -- | हकिकत अशा प्रकारे आहे कि, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी पोलीस आयुक्तालय हद्दीत पो.स्टाफसह खाजगी वाहनाने गुन्हेगार चेकिंग व अवैद्य धंद्यांवर रेड करने कामी पेट्रोलींग करीता असता गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक खबर मिळाली कि, एक इसम ॲक्टीवा गाडीवर अवैद्यरीत्या दारु चा माल घेवुन बेलपुरा कडे जात आहे. अशा माहीती वरुन नमुद घटनास्थळी सापळा रचुन थांबलो असता नमुद आरोपी हा ॲक्टीवा गाडीवर जातांना मिळुन आला असता त्या थांबवुन गाडीचे पायदाना जवळ एका प्लास्टीकच्या पिशवी मध्ये ४८ नग रॉयल चॅलेन्ज विस्की १८० एम.एल. च्या सिलबंद बॉटल प्रत्येकी १९०/ रु एकुण ९१२०/- रु चा माल तसेच ४८ नग ऑफिसर चॉईस विस्की १८० एम.एल. च्या सिलबंद बॉटल प्रत्येकी १५०/- रु एकुण ७२००/- रु चा माल मिळुन आला सदर इसम हा अवैद्यरीत्या विदेशी दारुची वाहतुक करत असल्याचे निष्पन्न झाले. अशा फि. चे लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ **अकस्मात मृत्यु :-**

| अ.क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटाा स्थळ | मृतकाचे ाांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर मर्ग क्र ३७/२०२४ कलम १९४ **BNSS** | जिल्हा सामान्य रुग्नालय अमरावती परीसरात | दिपक पंजाबराव मोहोड वय ६५ वर्ष व्यवसाय मजुरी रा पुसदा ता जि अमरावती | मनोज रामकृष्ण चोपडेवय ४५ वर्ष व्यवसाय मजुरी रा ग्राम पुसदा ता जि अमरावती | समजुन आले नाही ब्राथ डेथ | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी याचे आईचे दि ०३/०७/२०२४ रोजी सामान्य रुग्णालय अमरावती येथे डोळयाचे ऑपरेशन झाले होते मयत हा तिला उपचारा करीता दवाखान्यात नेत होता मयतने आईला उपचारा करीता दवाखान्यात नेले व दवाखान्यातुन बाहेर गेला होता तो आई सोबत घरी परत न आल्याने मी आईला विचारले की दिपक कुठे आहे तु सोबत का आली नाही त्यावर फि चे आईने दिपक हा बाहेर गेला होता तो अमरावतीलाच आहे असे सांगीतले त्याचा शोध घेतला असता मिळुन आला नाही दि १६/०७/२०२४ रोजी दुपारी ०१.३० वा दरम्याने फि चे भाउ विनोद याने माहीती दिली की दिपक हा जिल्हा सामान्य रुग्णालय अम येथे मरण पावला आहे आम्ही ईर्विन दवाखाना येथे आलो असता पोलीसांनी आम्हाला दिपकचा फोटो दाखवला आम्ही त्याला ओळखले त्याला पाहील्यावर तो माझा सावत्र भाउ असल्याचे खात्री झाली. मयत हा ब-याच दिवसापासुन आजारी होता तो कोणा सोबत बोलत नव्हता तो उपचार देखील घेत नव्हता. तो आज रोजी मरण पावला आहे त्याचे कोणा सोबत भांडण नाही तो आजारी असल्याने मरण पावला आहे त्याला कोणीही मारलेले नाही त्याचा अपघात झाला नाही माझा कोणावरही संशय नाही त्याला कोणत्याही वाहनाने धडक मारली नाही. नमुद घ ता वेळी व ठिकाणी मयत हा रस्तयाचे डिव्हायडरवर पडलेला होता त्याला सिटी कोतवाली येथील पोलीसांनी ईर्विन दवाखाना येथे भरती केल्यानंतर तो मरण पावल्याचे वैदयकीय अधिकारी यांनी सांगीतले आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने र्मग दाखल करुन तपासात घेतला. |